आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२० जानेवारी २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताचा विकासदर पुन्हा ७-८ टक्क्यांवर जाईल, जागतिक आर्थिक मंचाच्या अध्यक्षांकडून विश्वास व्यक्त

- राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तपदी दिनेश वाघमारे यांची नियुक्ती

- पश्चिम बंगालमधल्या आर जी कार रुग्णालयातल्या डॉक्टरवरच्या बलात्कार आणि खूनप्रकरणी दोषीला जन्मठेप

**आणि**

- अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प आज शपथ घेणार

<><><><><><>

भारताचा विकासदर पुन्हा ७-८ टक्क्यांवर जाईल, असा विश्वास WEF अर्थात जागतिक आर्थिक मंचाचे अध्यक्ष आणि कार्यकारी अधिकारी बोर्ग ब्रेन्डे यांनी वर्तवला आहे. भारतात गुंतवणूक, पायाभूत सुविधा, शिक्षण, संशोधन यासारख्या क्षेत्रात आर्थिक सुधारणांमुळे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. त्यामुळे जीडीपी अर्थात राष्ट्रीय स्थूल उत्पादन वाढीचा दर गाठता येईल, असं त्यांनी सांगितलं.

स्वित्झर्लंडमधल्या दावोस इथं आज या मंचाची ५५ वी बैठक सुरू झाली. त्यावेळी ते बोलत होते. या पाच दिवसांच्या बैठकीला १३० देशांचे ३ हजार प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यात साडेतीनशे सरकारी अधिकारी उपस्थित आहेत.

**<><><><><><>**

देशात ७० ते ८० लाख असंघटित कामगार आहेत. कोणताही भेदभाव न करता कामगारांना सामाजिक सुरक्षा देणं याला सरकारचं प्राधान्य असल्याचं केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी आज सांगितलं. सरकारच्या आरोग्यसेवा योजनांचे अंदाजे ६० कोटी लाभार्थी असून त्यांना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य उपचार मिळाल्याची माहिती मांडविय यांनी दिली.

**<><><><><><>**

विधीमंडळाद्वारे देशातल्या नागरिकांची सेवा करण्याची महत्त्वाची जबाबदारी पीठासीन अधिकाऱ्यांवर आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी केलं. पाटण्यात सुरू झालेल्या ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते आज बोलत होते. विधीमंडळात होणारे गोंधळ टाळला आणि त्यांचं पावित्र्य जपा. संविधानानं घालून दिलेल्या मूल्यांच्या आधारे नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

लोकसभा, राज्यसभेसह देशाच्या विविध भागातून आलेले विधीमंडळांचे अध्यक्ष आणि इतर अधिकारी यात सहभागी झाले आहेत. याविषयी आकाशवाणीशी बोलताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले…

**होल्ड बाईट - राहुल नार्वेकर ( १२ सेकंद)**

संविधानाच्या अंमलबजावणीला ७५ वर्ष होत असताना संसद आणि राज्य विधीमंडळांचं संविधानाच्या बळकटीतलं योगदान यावर या संमेलनात विशेष चर्चा होत आहे. देशाच्या राज्यघटनेनं भारताला शक्तीशाली राष्ट्र होण्यासाठी भक्कम आधारशिला प्राप्त करुन दिल्याचं विधान परिषदेचे सभापती राम शिंदे याविषयावर बोलताना म्हणाले.

**<><><><><>**

देशातले युवावर्ग ही देशाची संपत्ती असून ते राष्ट्र उभारणी आणि समृद्धीमध्ये योगदान देतील, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं राष्ट्रीय छात्र सेनेच्या प्रजासत्ताक दिन शिबिर २०२५ ला संबोधित करताना बोलत होते. यावेळी छात्र सेनेतल्या विद्यार्थ्यांनी संरक्षण मंत्र्यांना मानवंदना दिली. काही छात्रांनी केलेल्या अद्वितीय कामगिरीमुळे त्यांना रक्षामंत्री पदकांनी गौरवण्यात आलं, त्यात महाराष्ट्राच्या मनन शर्मा या छात्राचा समावेश आहे.

**<><><><><>**

गेल्या आर्थिक वर्षात भारताकडून होणारी कॉफीची निर्यात १ अब्ज २९ कोटी डॉलर्स इतकी झाली आहे. आता भारत जागतिक स्तरावरचा सातव्या क्रमांकावरचा कॉफी उत्पादक देश बनला आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. २०२०-२१ या काळात भारताने ७१ कोटी ९० लाख रुपये किमतीची कॉफी निर्यात केली होती. त्या तुलनेने गेल्या वर्षीची निर्यात दुप्पट असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. या महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यात भारताने ९ हजार ३०० टनांहून

अधिक कॉफी निर्यात केली होती.  इटली, बेल्जियम आणि रशिया या देशांनी ती कॉफी खरेदी केली आहे. भारतात, कर्नाटक या राज्यात कॉफीचं सर्वाधिक उत्पादन घेतलं जातं त्यानंतर केरळ आणि तामिळनाडू या राज्यांचा क्रमांक लागतो.

<><><><><>

उत्तराखंड राज्य मंत्रिमंडळाने आज समान नागरी संहितेला मान्यता दिली. या निर्णयामुळे उर्वरित राज्यांना त्याची प्रेरणा मिळेल, अशी आशा मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी  व्यक्त केली.

<><><><><>

छत्तिसगडमधल्या गरियाबंद जिल्ह्यात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत दोन माओवादी ठार झाले. या चकमकीत कोब्रा बटालियनचा एक जवान जखमी झाला आहे.

<><><><><>

राज्य निवडणूक आयुक्तपदावर आज सेवानिवृत्त सनदी अधिकारी दिनेश वाघमारे यांची नियुक्ती झाली आहे. राज्यपालांच्या मंजुरीनंतर सामान्य प्रशासन विभागाने आज हा आदेश राजपत्रात प्रसिद्ध केला. आगामी पाच वर्षांसाठी ही नियुक्ती असणार आहे.

<><><><><>

राज्य सरकारनं रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती दिली आहे. आदिती तटकरे यांची रायगडच्या आणि गिरीश महाजन

यांची नाशिकच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती झाली होती. मात्र प्रजासत्ताक दिनी या दोन्ही जिल्ह्यांमध्ये त्यांच्याच हस्ते ध्वजारोहण होईल, असा शासन निर्णय सरकारनं आज प्रसिद्ध केला.

**<><><><><>**

रायगड आणि नाशिक इथल्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती दिल्यावरून विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली. आज पालकमंत्री बदलतील, तर उद्या उपमुख्यमंत्री बदलतील. बहुमत मिळूनही महायुती सरकारमध्ये धुसफूस सुरू आहे, अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

पालकमंत्रिपदाला स्थगिती देणं हा त्या पदाचा अपमान आहे, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. महायुती सरकारमध्ये मंत्रिपद आणि बंगल्यासाठी भांडणं होत आहेत, हे जनतेची सेवा कशी करणार याचा विचार जनतेनं करावा असं ठाकरे म्हणाले. सैफ अली खान हल्ला प्रकरणावरून ठाकरे यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर टीका केली.

दरम्यान पालकमंत्री पदावरुन महायुतीमध्ये कुठलेही वाद नसल्याचा दावा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. काही कुरबुरी असतील तर चर्चेतून मार्ग निघेल, असं ते म्हणाले. सत्ता न मिळाल्यानं विरोधक अस्वस्थ झाले आहेत. त्यातूनच ते नको त्या गोष्टींचं राजकारण करत असल्याचं बावनकुळे म्हणाले.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित चकमकीमध्ये झालेल्या मृत्यूला पाच पोलीस कर्मचारीच जबाबदार असल्याचा निर्वाळा न्यायालयीन चौकशी अहवालात दिला आहे. त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

**<><><><><>**

संरक्षण, अवकाश तंत्रज्ञान, ऑटोमोटिव्ह उत्पादनं आणि वैद्यकीय उपकरणांच्या विकास आणि उत्पादन मानकांसाठीच्या केंद्र सरकारच्या प्रयोगशाळेचं भूमिपूजन आज नवी मुंबईत झालं. समीर अर्थात सोसायटी फॉर अप्लाइड मायक्रोवेव्ह इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग अँड रिसर्चच्या आवारात इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांनी ही पायाभरणी केली. विविध उपकरणं वापरात आणण्यापूर्वी ती लष्करी मानके आणि नागरी मानके दोन्हीसाठी पात्र असणं अनिवार्य आहे. त्यासाठी ही प्रयोगशाळा काम करणार आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या आर जी कार रुग्णालयातल्या डॉक्टरवरच्या बलात्कार आणि खूनप्रकरणी दोषीला न्यायालयानं जन्मठेपेशी शिक्षा सुनावली आहे. सियालदाहमधल्या सीबीआयच्या विशेष न्यायालयानं हा निकाल दिला. पीडीतेच्या कुटुंबाला १७ लाख रुपये देण्याचे आदेशही न्यायालयानं दिले आहेत. आरोपी संजय राय याला शनिवारी दोषी ठरवलं होतं. गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात ही घटना घडली होती.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी आतापर्यंत ३९७ गुन्हे दाखल केले आहेत. एका निवेदनाद्वारे दिल्ली पोलिसांनी आज ही माहिती दिली. २१२ विना परवाना शस्त्रं, सुमारे 36 हजार लिटर दारू आणि १५कोटी रुपये किमतीचे सुमारे ७५ किलोग्राम ड्रग्स जप्त करण्यात आले आहेत, प्रतिबंधात्मक कारवाई आणि इतर कायद्यांतर्गत पोलिसांनी १४ हजारांहून अधिक लोकांना अटक केली आहे, असंही या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प आज शपथ घेणार आहेत. वॉशिंग्टन डीसी इथं अमेरिकेचे मुख्य न्यायाधीश जॉन रॉबर्ट्स यांच्या उपस्थितीत ट्रम्प राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतील. सत्तेच्या अधिकृत हस्तांतरणाचा भाग म्हणून ट्रम्प उद्घाटन भाषण देखील करतील. जेडी व्हॅन्स अमेरिकेचे उपाध्यक्ष म्हणून शपथ घेतील. शपथविधी सोहळ्याला देशविदेशातले अनेक नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. परराष्ट्रमंत्री एस जयशंकर भारताचं प्रतिनिधित्व करतील.

<><><><><>

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत अग्रमानांकित इटलीचा यानिक सिनर यानं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. चौथ्या फेरीत त्यानं अटीतटीच्या सामन्यात डेन्मार्कच्या होल्गार रूने याच्यावर ६-३, ३-६, ६-३, ६-२ अशी

मात केली. तर महिला एकेरीत सहाव्या मानांकित कझाकस्तानच्या एलेना रिबाकीना हिला पराभवाचा धक्का बसला. अमेरिकेच्या मॅडिसन कीज हिनं तिचा ६-३, १-६, ६-३ असा पराभव केला.

**//<><><><><><>//**